REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# श्री चक्रधर स्वामींची सामाजिक समरसता

प्रा. डॉ. कल्पना मेहरे
मराठी विभाग प्रमुख , नारायणराव राणा महाविद्यालय , बडनेरा (रेल्वे) जि. अमरावती.



बाराव्या शतकात महाराष्ट्राच्या या पवित्र भूमीमध्ये उदयास आलेल्या महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी आहे. महानुभाव पंथ हा द्वैती मताचा भक्ती पंथ असून या पंथाचे कार्य विशाल आहे. त्याकाळात देवगिरीला यादव राजाची राजवट होती. यादवराजा हा वैदीक धर्माचा पुरस्कर्ता होता. त्याचा श्री करणधिपती हेमाद्री पंडित याने चतुर्वर्गचिंतामणी नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात त्याने एका वर्षात दोन हजार व्रत वैकल्ये करण्यास सांगितले. बहुजन समाज हा अज्ञानात खितपत पडलेला होता. देवी देवतांचे स्तोम माजलेले होते. उपास तापास व्रत वैकल्ये मोठया प्रमाणावर केली जात होती. देवी—देवतांना नवससायास बोलले जात होते. नर बळी दिले जात होते. जातीयता होती. समाजात दिवसेंदिवस सामाजिक तसेच आर्थिक विषमतेची दरी अधिकाधिक वाढत होती. बहुजनांना धर्माचा अधिकार नव्हता. संस्कृत भाषा ही देववाणी होती. बहुजनवर्ग हा ज्ञानापासून वंचित होता. दैन्य दु:ख दारिद्रय याने बहुजन वर्ग त्रस्त होता. स्त्रीला धर्माचा अधिकार नव्हता. स्त्रीला मोक्ष मार्गातील धोंड मानले जात होते. स्त्रीचे चूल आणि मूल एवढेच मर्यादित क्षेत्र होते. जाचक रुढी प्रथांचे प्रस्थ दिवसेंदिवस वाढले होते. या संदर्भात श्री चक्रधर स्वामी म्हणाले. हा अवघा जनु ठकला ठेला असे कवणी याचे थक फेडिता नाही.तु का थकलासि ऐसे कव्हणी म्हणते नाही. अशा समाजाला श्री चक्रधरांनी आधार दिला.

श्री चक्रधर हे कृतिशील समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या कृतीतून जातीभेदाच्या अभेद्य भिंतीना तडा देण्याचे महान कार्य केले. त्यांनी स्थापन केलेल्या पंथात सर्व जातींची लोकं होती. त्याकाळात स्वामींनी स्पृश्यास्पृशतेचा भेदाभेद दूर केला. चर्मकाराच्या हातचा विळा खाउन त्याला स्थिती प्राप्त करुन दिली. हे चर्मकार भेटी या लीळेवरुन दिसून येते. श्री चक्रधरांना माणसामाणसात भेद मान्य नव्हता. जाती भेदाच्या भिंती त्यांना पाडायच्या होत्या. ब्राम्हण आणि मातंग. हे दोन्ही ते सारखेच मानत. कर्मचांडाळापासी जाती चांडाळ चांग हे त्यांचे सूत्र होते. त्यांनी महारवाडयाहुनी धर्म काढायला सांगितला.

समाजातील सामाजिक विषमतेची मुळे समूळ उखळून टाकण्यासाठी त्यांनी सातत्याने आपल्या कृतीतून प्रयत्न केला. मांगाच्या हातचा लाडू ते ब्राम्हणांना प्रसाद म्हणून देतात. स्वामी एकदा जोगेश्वरीच्या मंदीरात असतांना त्यांना भेटण्यासाठी तीन मातंग आले होते. त्यापैकी एकाने स्वीमींचे दर्शन घेण्यासाठी मंदीरासमोर उभे राहण्याचे ठरविले. ही गोष्ट आउसेनी स्वामींना सांगितली. स्वामींनी त्या मातंगाची परीक्षा घेण्याचे ठरविले. त्यांनी आउसे करवी प्रसाद म्हणून लाडू दिले व घरी जाण्यास सांगितले आणि ती आत निघून गेली. परंतु तो मातंग तिथेच स्वामींच्या भेटीसाठी उभा होता. आउसा त्याच्यावर रागावली परंतु तो म्हणाला आज माझा प्राण गेला तरी चालेल परंतु मी माझ्या देवाला बघितल्याशिवाय येथून हलणार नाही. त्याची ती अढळ श्रध्दा व भक्ती पाहून स्वामी गहिवरलेत व त्याची भेट घेण्यास मंदिराबाहेर आलेत.

स्वामींना पाहून तो मातंग खूप आनंदी झाला. त्याला कळत नव्हते की आपण स्वामींची पूजा कशी करावी म्हणून त्याने स्वामींनी काही वेळा पूर्वी पाठविलेले प्रसादाचे लाडूच स्वामींना अर्पण केले. स्वामींनी मातंगाचा लाडू स्विकारला व मंदिरात येउन आपल्या ब्राम्हण भक्त उदेशून म्हणाले प्रसाद वादिऐहो प्रसादु घेयाल 'विकार विकल्प शून्यता होवाची की गा: तुम्ही अच्युत गोत्रीय की गा:? तुम्हा परस्परे परमप्रिती होचावी की: अशाप्रकारे सर्वज्ञ श्री चक्रधरांनी आपल्या कृतीतून सामाजिक समता निर्माण केली.

समाजात ज्याकाळात अस्पृश्याची सावलीही वर्ज्य मानली जायची त्याकाळी चर्मकाराला स्थिती देउन त्याच्या त्या अवस्थेत नगरातील ब्रम्हवृंदाना त्याची पूजा करायला लावण्याचे अलौकिक कार्य त्यांनी केले. तसेच दाकोबा सारख्या अंत्यजाला मंदिर प्रवेश घडवून स्वत:बरोबर आपुलिया पाती जेवायला बसविले होते. ब्राम्हण शिष्याकरवी त्याला जेवण वाढले होते. त्याला पाय धुवायला पाणी देवविले होते. व भोजनोत्तर दाकोबासारख्या अस्पृशाला एका ब्राम्हण शिष्याकरवी त्यांनी तांबुल देवविला होता. अशा अलौकिक सामाजिक कार्यासाठीच ते सतत महाराष्ट्रभर फिरले.

श्री चक्रधर स्वामींना स्त्री—पुरुष समानतेचा पुरस्कार केला. ज्याकाळात स्त्रियांना कोणतेही ज्ञान ग्रहण करण्याचा अधिकार नव्हता त्याकाळात स्वामींनी त्यांना पुरुष्यांच्या बरोबरीचे स्थान दिले. सारंग पंडिताच्या मनातील स्त्री द्वेष दूर करताना स्वामी त्याला म्हणतात (डोमेग्राम लीळा) तुझा तो जीव आणि स्त्रियांचा काय जीव नसे? काय स्त्रियांचा आणि पुरुषांचा परमेश्वर अलग आहे. दोघांनाही जीव आहे. जे एकाच परमात्म्याची निर्मिती आहे. मग तू हा भेदाभेद का पाळतोस. हा अधिकार तुला कुणी दिला? तू जर असे करशील तर तुला पाप लागेल व तुझे ज्ञान केव्हास पूर्णत्वास जाणार नाही. तू आज खूप मोठे पाप केलेस त्याची शिक्षा तुला झालीच पाहिजे. शास्त्र सांगते. सर्वांचा जीव सारखाच आहे. तर तू भेदाभेद का पाळतोस व मनात आणतोस ? हे सर्व ऐकूण सारंग पंडित खूप खजिल झाला व स्वामींना म्हणाला, माझ्याकडून महापाप झाले. आपण जो दंड मला द्याल तो मी भोगायला तयार आहे. मला माफ करा. तुला पश्चाताप झाला हे चांगले आहे. पण तू अक्षम्य गुन्हा केला याचे प्रायश्चित म्हणून तू गंगेत (गोदावरीत) जाउन उभा रहा. या प्रसंगातून स्वामी स्त्री—पुरुष समानता सर्वांना पटवून देतात.

यादव काळात निरर्थक कर्मकांडाचे प्रस्थ माजले होते.मोक्षाच्या प्राप्तीसाठी प्रत्येक समाजात सर्वत्र अनेक देवांची उपासना आणि व्रत वैकल्य केली जात होती.या सर्व बाबी मोक्षमार्गीयांना उपयोगाच्या नाहीत म्हणून त्या त्यागण्यांचा स्वामींचा आग्रह होता.बहिष्कृत समाजात तथाकथित शूद्रातीशुद्र शेंदरी—हेंदरी देवतांची हिंसाप्रधान पूजा होत होती.दगडाला शेंदूर लावला की देवता तयार होत असे आणि कोंबड बकर कापल की त्या प्रसन्न होतात.अशी श्रध्दा खालच्या स्तरातील भोळया—भाबडया जनांच्या मनात होती. भट —ब्राम्हण आपली पोटे भरीत होता. ही अंधश्रध्दा नाहीसी व्हावी यासाठी आग्रह धरणारे श्री चक्रधर स्वामी हे पहिले अंधश्रध्दा निर्मूलनकर्ते होय.

समाजाला सचेत करण्याचे कार्य श्री चक्रधरांनी केले.सनातन्य वाढल्यामुळे सर्वसामान्य समाजाला कोणी द्रष्टा किंवा मार्गदर्शक नव्हता. तेंव्हा श्री चक्रधरांनी भटकलेल्या समाजास मार्गदर्शन केले. तत्कालीन समाजात खितपत पडलेल्या दलित—स्त्रीशूद्रादिकांना त्यांनी दिलासा व प्रेम दिले.सर्व वर्गातील स्त्रियांना त्यांनी ममतेची वागणूक दिनी. सर्व समभावांचा व समतेचा दिव्य संदेश दिला.ईश्वर विषयीचे खरे ज्ञान त्यांनी सर्वसामान्यांना करुन दिले.संसार तापाने पोळलेल्या जीवांना अव्दैताश्रित वेदोक्त देवतोपासनेच्या कर्मकांडातून सोडवून परमेश्वराच्या अनन्य भक्तीचा मार्ग त्यांनी उपदेशीला.

श्री चक्रधरांनी शुध्द शाकाहाराचा पुरस्कार केला. सप्त व्यसनापासून दूर राहण्याची शिकवण दिली. मास खाणे, दारु पिणे, जुगार खेळणे हिंसा करणे वेशागमण करणे, चोरी करणे आणि, खोटे बोलणे ही सप्तव्यसने मनुष्याला पशुतुल्य बनवून, त्याचा विवेक नाहीसा करतात. सुजान, सुशील, चारित्रसंपन्न युवक युवती निर्माण व्हाव्यात समाजाचे आधारस्तंभ म्हणून त्यांनी पुढे यावे हिच स्वामींची इच्छा त्यांच्या तत्वज्ञानातून दिसून येते. माणसाने सात्विक जीवन जगावे, मधुर भाषी असावे.प्रयत्नांची कास न सोडता अखंड परमेश्वर स्मरण करावे, मुंगींचेही वैर चिंतू नये, मारीता—पूजीता समान मानावा असा मानवतेचा धर्म सर्वज्ञ श्री चक्रधर या जननायकानी शिकविला. कसल्याही व्यसनांच्या आहारी न जाता परस्परांमध्ये प्रेम सलोख्याचे संबंध प्राणी मात्रांवर दया, प्रेम करण्याची शिकवण दिली. आहार, आचार, विचार यांच्यातील सात्विकतेला महत्त्व दिले. सर्वसामान्यमाणसांपर्यंत धर्माचे तत्त्वज्ञान साध्या सोप्या मराठी भाषेत पोहोचावे

यासाठी ग्रंथ मराठी भाषेतूनच लिहिले जावे, शास्त्रचर्चा मराठीतून करावी हे सांगीतले. श्री चक्रधर स्वामी मराठी अनिवार बोलत असत. प्रगाढ पंडित केशीराजबास यांनी संस्कृत भाषेतून ग्रंथ लिहिण्याची इच्छा व्यक्त केली असता तुमचा अस्मात करमात ती नेणे गा: येणे माझा सामन्य परिवारु नागवेल. म्हणौनी केशवा संस्कृत सूत्रबध्द न करी तू की अशा शब्दात संस्कृत भाषा नाकारुन महानुभाव पंथाचे प्रथम आचार्य श्री नागदेवाचार्य यांनी मराठी भाषेला श्रेष्ठत्वाचा मान दिला. मराठी सुवर्ण काळाची सुरुवात करणारा हा पंथ आहे.

## निष्कर्ष

(१) श्री चक्रधर स्वामी हे कृतीशील समाज सुधारक होते. तत्कालीन समाजातील चार्तुवर्ण व्यवस्था व तिच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक विषमतेचा त्यांनी कडाडून विरोध केला.
(२) स्त्रियांना धर्माचा अधिकार दिला.
(३) मराठी भाषेला धर्मभाषेचा दर्जा दिला.
(४) श्री चक्रधरांनी परमेश्वर भक्तीचे गमक सांगून चिरसुखाचा मार्ग समाजाला दाखविला.

## संदर्भ ग्रंथ सूची

(१) लीळाचरित्र: संशोधन समीक्षा—डॉ.स्मिता ठाकरे, ओंकार प्रकाशन,अमरावती
(२) लीळाचरित्रातील समाजदर्शन—सुमन बेलवलकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई
(३) लीळाचरित्र—संपा. प्रा. पुरुषोत्तम नागपूरे, ओंकार प्रकाशन अमरावती
(४) सर्वज्ञ श्री चक्रधरांची शिकवण—आचार्य दीपक तायडे, निर्गुण ब्रम्ह प्रकाशन अमरावती
(५) मानवतेचा महान मानदंड—प्रा.आवलगावकर रमेश वामन
(६) संतानीसुध्दा वाळीत टाकलेला श्री चक्रधर—वैद्य प्रभाकर, किशोर प्रकाशन, अमरावती